प्रेसनोट

लाप्र. विभाग, धुळे
दिनांक ०७.०७.२०२६

**यथार्थ पांडुरंग निनावे, उपविभागीय अभियंता (वर्ग ०१), जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चाळीसगांव यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७,०००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम कुलदिप गमे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चाळीसगांव यांचे हस्ते स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| ला. प्र. विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र. | चाळीसगांव शहर पो.स्टे. गुरनं. ३२८ /२०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दि | भ्र.प्र. कायदा कलम ७ व १२ प्रमाणे, दि.०७.०७.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | १. यथार्थ पांडुरंग निनावे, वय ४५ वर्षे, उपविभागीय अभियंता (वर्ग ०१), जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चाळीसगांव,<br>२. कुलदिप विरुचंद गमे, वय ३० वर्षे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (वर्ग०३), जिल्हा परिषद,बांधकाम विभाग, चाळीसगांव |
| लाचेची मागणी | १०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/— रुपये (तडजोडीअंती) |

**थोडक्यात हकिगत :—** यातील तक्रारदार यांचे मित्र शासकिय ठेकेदार असुन त्यांनी मौजे दहिवद येथे ग्रामपंचायत १५ व्या वित्तयोजने अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरणाचे व गांवहाळचे काम घेवुन सदरचे काम त्यांनी तक्रारदार यांना करावयास दिले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी सदरची कामे मुदतीत पुर्ण करुन सदर कामांचे मोजमाप होवुन मोजमाप पुस्तिकेत त्याच्या नोंदी व मुल्यांकन होवुन मोजमाप पुस्तिका झालेल्या कामांचे एकुण १०,४७,८४३/— रु. चे बिल अदा करण्याकरीता उपविभागीय अभियंता यथार्थ निनावे यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी दि.०३.०७.२०२६ रोजी उपविभागीय अभियंता यथार्थ निनावे यांची त्यांच्या कार्यालयात जावुन भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे एकुण बिलाच्या एक.टक्क्याप्रमाणे १०,५००/— रु. ची लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी आज दि.०७.०७.२०२६ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची आज रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता उपविभागीय अभियंता यथार्थ निनावे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी केलेल्या कामाच्या एकुण बिलाच्या एक टक्क्याप्रमाणे तक्रारदार यांच्याकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७,०००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर आज रोजी सापळा कारवाई दरम्यान उपविभागीय अभियंता यथार्थ निनावे यांनी त्यांचे कक्षात तक्रारदार यांचेकडुन कुलदिप गमे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांचे हस्ते लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आल्याने गुन्हा

| | |
|---|---|
| सापळा अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| तपास अधिकारी | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| सापळा पथक | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, रामदास बारेला, प्रविण पाटील, जगदीश बडगुजर |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :— | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे |
| संकेतस्थळ | :— | acbmaharashtra.gov.in |
| ईमेल | :— | dyspacbdhule@gmail.com |
| टोलफ्री कमांक | :— | १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :— | ०२५६२—२३४०२० |
| व्हॉटसअॅप क्रमांक | :— | ७७९८१६१०६४ |

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.